॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भौतिकशाख प्रशाळेमधील इलेक्ट्रॉनिक्स विभागात दिनांक 13 जुलै 2026 पासून बी. एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स आणि एम. एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. बी. एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी १२ वी (H.S.C. (Class XII) सायन्स /इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रिकल मधील डिप्लोमा किंवा इलेक्ट्रॉनिक्स / इलेक्ट्रिकल सह 10+2 M.C.V.C. कोर्स पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच एम. एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी B.Sc. (Electronics/ Physics/ Computer Science/Electronics Science) किंवा B.Voc. in Industrial Automation किंवा B.E./ B.Tech. with Electronics and Telecommunication /Electronics/Instrumentation असलेले विद्यार्थी प्रवेशास पात्र राहतील. अधिक माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या वेब साईट वर UG/PG Admission 2026-27 मध्ये मिळेल. बी. एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स आणि एम. एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याची अंतिम मुदत 14 ऑगस्ट 2026 आहे. तेव्हा पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी त्वरित नोंदणी करून आपला प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मा. संचालक भौतिकशाख प्रशाळा यांचेकडून करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी मोबाइल क्रमांक 9422338132 किंवा इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या 0257-225475 या कार्यालयीन फोनवर संपर्क साधावा.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. ७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंती निमित्तानेविचारधारा प्रशाळेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. ११ ऑगस्ट, २०२६ रोजी 'सांगे बहिणा' यांच्या सांगितिक नाट्य विष्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी उपस्थित राहणार आहे, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती मनिषा कोल्हे (आसोदेकर) व त्यांचे कलावंत या सांगितिक नाट्य विष्काराचे सादरीकरण करणार आहेत. सदरचा कार्यक्रम ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास विद्यापीठातील शैक्षणिक / प्रशासकीय विभागांचे संचालक,विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी व विद्यार्थी यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन प्रशाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

..........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ७ ऑगस्ट, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

ज

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता